# प्रथम सत्रान्त परीक्षा २०२२-२३

वेळ-१.३० तास) **वर्ग ८ वा** (एकूण गुण-५०

**विषय- मराठी**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना:**

१) सूचनेनुसार आकलन कृति व व्याकरण कृती यामधील आकृत्या काढाव्यात.

२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमानुसार लेखन याकडे जाणीपूर्वक लक्ष द्यावे.

**विभाग १ गद्य**

**प्र. १-अ) पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.**

**कृती-१ आकलन कृती** २

**१) आकृती पूर्ण करा.**

अण्णाभाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व विशेष

| | |
|---|---|
| | |

माझे आकाशवाणीवरील कार्यक्रम फारच गाजत राहिले. ते अण्णा भाऊ साठेंनी बऱ्याचदा ऐकले. एकदा अण्णा भाऊ साठे यांनी मला ''चिरागनगरात येऊन भेटा'', असा भिकाजी तुपसौंदर या माझ्या मित्राकडे निरोप पाठवला. मला अत्यानंद झाली. एवढ्या मोठ्या माणसानं मला भेटायला बोलावलं म्हणजे, काहीतरी शाहिरी कार्यक्रम असावा. दुसऱ्या सायंकाळी चारच्या सुमारास चिरागनगरीची, खाचखळग्यांची ओबडधोबड वाट तुडवत, अण्णांचं घर विचारत विचारत एका झोपड्यापाशी आलो. त्या झोपड्याच्या दारात वलानीला बाळवती सुकत घालत असलेल्या बाईला ''अण्णा भाऊ साठेंचंघर कोणतं?'' म्हहून विचारलं.

'ती म्हणाली, ''ह्री बगा, डाव्या अंगानं आसंच म्होरं जावा, थितं च्यावाल्याचं हाटील हाय, आंगं तेव्याच म्होरल्या आंगाला इचारा. थितंच जयवंताबाय ऱ्हातीया.''

मी म्हणालो, ''आहो ताई, मी अण्णा भाऊ साठेंचं घर विचारतोय.''

ती म्हणाली, ''आवं, मग मी तेच की सांगतीया. आवं, जयवंता बाय हायना, ती अण्णांची मालकीण हाय. जावा कडंकडंनं, चिरागनगरातली ही वाट सदान्‌कदा चिखलापान्यात लोळत पडलिया- कडंककडंनंच जावा.''

मी पुढे नेमका चहाच्या हॉटेलाजवळ गेलो. चहावाल्याला विचारलं, ''अण्णा भाऊ साठेंचं घर कोणतं?'' ''वो क्या, वो पांचवा झोपडा है ना, वहांच अण्णा रहेता है।'' त्यानं दुरून घर दाखवलं. मी झोपड्याच्या दारात जाऊन पोहोचलो. दारातून अण्णा भाऊंना हाक मारली. साडेचार फूट उंचीची माझ्यासारखीच काळीसावळी मूर्ती घामेजलेल्या अंगानंच बाहेर आली. अण्णा भाऊंना मी प्रथमच पाहत होतो. त्यांनी मला ओळखलं. ''तुम्ही विठ्ठल उमप शाहीर ना?'' मी ''होय'' म्हणालो. ''या'' असं म्हणून मला त्यांच्या झोपडीत नेलं.

https://www.maharashtrastudy.com

अण्णांनी मला मोडक्या बाजावर बसायला सांगितलं. अण्णांनी आपलं मळकं गंजीफ्राक (बनियन) घातलं आणि आमही बाहेर आलो. मला अण्णा भाऊंचं घर दाखवलं त्याच चहावाल्याच्या हॉटेलात अण्णांनी चहा दिला. तिथेच त्यांनी "शाहीर, तुम्ळी केव्हापासून गाता?" वगैरे चौकशी केली. मी मोकळेपणाने; पण लाजतबुजत सारं काही सांगन टाकलं. ऐकून त्यांचा खूप बरं वाटलं. आम्ही चहा घेतला. अण्णा म्हणाले, "तुम्ही फार चांगलं गाता, तुमच्या रचना आकाशवाणीवरून ऐकल्या. तुमच्या बुलंद पहाडी आवाजाने मला मोहून टाकलं. तुमच्या वागणुकीची, वर्तनाची इतरांकडून माहिति मिळाली. तुमच्यामधला आवाजाचा गोडवा मी अनेकदा चाखलाय विठ्ठलराव. मला रहावेच ना. तुम्हाला केव्हा भेटेन असं सारखं वाटतं होतं. तो सदिन आज उगवला.

**कृति –२ आकलन कृती**

**१) एका शब्दात उत्तरे लिहून चौकटी पूर्ण करा.** २

अ) अण्णाभाऊ साठे यांचे राहण्याचे ठिकाण ☐

ब) आकाशवाणीवर कार्यक्रम गाजवणारे ☐

**२) नातेसंबंध लिहा.** २

अ) विठ्ठल उमप –भिकाजी तुपसोंदर

ब) जयवंताबाय –अण्णाभाऊ साठे

**कृति –३ व्याकरण कृती**

**१) पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा.** १

अ) उजव्या × ——— ब) सकाळी ×


**२) पूढील जोडशब्द पुर्ण करा.** १

अ) ---- बुजन ब) ----- सावळी

**प्र. २ अ) पुढील उतारा वाचा आणि दिलेल्या सुचनांनुसार कृती करा.**

**कृति १: (आकलन कृती)** २

**आकृती पूर्ण करा.**






https://www.maharashtrastudy.com

इंजिन मध्ये बिघाड झाल्यामुळे नागपूर- दादर एक्सप्रेस इगत पुरी स्टेशनवर तीन तास थांबून राहिली. गाडीतले प्रवासी कंटाळून प्लॅट फॉर्मवर येरझारा घालू लागले. कुणी बुक स्टॉलवरची वर्तमानपत्र घेऊन वाचत जागेवर आडवे झाले. दोन प्रवासी मात्र एका दगडी बाकावर जाऊन बसले. आणि त्यांच्या गप्पा सुरु झाल्या. सुमारे एक तासभर गप्पा मारल्यानंतर ते दोघेही कंटाळले. त्यांनी चहा मागवला. चहा घेतल्यानंतर त्यांच्या गप्प पुन्हा रंगल्या. ते एवढया मोठयानं हसत आणि बोलत होते, की त्यांचा शब्द नि शब्द दूरवर ऐकू जात होता. त्या दोन प्रवाशां मध्ये एक म्हातारा होता आणि दुसरा तरुण!

म्हातारा त्या तरुणाला म्हणाला, ''राजा, तुझं इंग्लंडला जाणं पक्कं झालं ना?''

''असं काय काका मला विचारता? मी पासपोर्ट मिळवला', व्हिसा काढला, नवीन कपडे टेलरने परवाच शिवून दिले. चार सूट आणि इतर नेहमीचे कपडे घेतले आहेत. तुम्ही दिलेले घडयाळ, तर मी आताच वापरायला काढलं आहे.''

''राजा, ते घड्याळ भारी किमतीचं आहे. दहा हजार मोजलेत. पिटसबर्गला ते घड्याळ खास तुझ्यासाठी घेतलं होतं. विमान प्रवासासाठी तुला पन्नास हजार रुपये पुरतील ना ? मुंबईला गेल्यानंतर मी तत्काळ तेवढी रक्कम तुला देईन ! पण बेटा सांभाळून जायचं बरं का!''

**कृति २:(आकलन कृती)**

**१) योग्य विधान शोधा.** २

१) दोन प्रवाशांमध्ये एक म्हातारा आणि दूसरा तरुण

२) म्हतारा व तरुन करोडपती होते.

३) इगतपूरी स्टेशनवर गाडी तीन तास खोळंबली होती १

४) अन्य प्रवासी गाण्यांच्या भेंड्या खेळत बसले होते.

**आकलन कृती ३** २

१) ते दोन प्रवासी प्रत्यक्षात कोण होते.

२) दोन प्रवासी कुठे जाऊन बसले.

**कृती ४ (व्याकरण कृती)** २

**१) पुढील शब्दांचे विरुध्दार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा.**

१) सूधारणा  २) अल्पमोली

**२) कंसात दिलेले प्रत्यय जोडून पुढील शब्दांचे रुप पुर्ण करा.** १

१) म्हातारा (ने)  २) तरुण (ला)

**प्र. ३- एक किंवा दोन शब्दात उत्तरे लिहा.** २

अ) खेडे जेंथे विसावते ते ठिकाणः-

ब) खेड्याला दिलेली उपमा.



https://www.maharashtrastudy.com

## विभाग २–पद्य

प्र. २– पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सुचनेनुसार कृती करा–

कृती १– आकलन कृती

१) आकृती पूर्ण करा– २

[ ] ← श्रावण महिण्याची विविध रूपे → [ ]

२) प्रश्न तयार करा– २

१) 'श्रावण' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२) 'इंद्रधुनष्याचा बांध' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

३) अर्थ लिहा– २

१) रंगारी २) सृष्टी ३) झुला ४) खेळगा

असा रंगारी श्रावण रंग उधळीत येतो
सृष्टीचा गा चित्रकार हिर्वा देखावा रेखितो
कलावंत हा साजिरा काय त्याची कलागत
जागोजागी चित्रांचीची त्यांन मांडली पंगत
नाचे दरी डोंगरात झिम्मा खेळतो नदीशी
रिमझिम पहाळीचं गाणं बोलतो झाडांशी
वेण्या गुंफितो वेलींचया वेली लाजल्या लाजल्या
पाना–फुलांचे पातळ थेंबाथेंबांनी सजल्या
झुले पोरींना झुलाया असे टांगतो झाडाला
देतो झुलता झुलता लय पोरींच्या गाण्याला
पोरांमध्ये खेळायला होतो श्रावण खेळगा
दहीहंडीच्या संगती चिंब गोपाळ अवघा
पावसाचं घर कसं लख्ख उन्हात बांधतो
खोडी काढून खट्याळ झाडाआड तो लपतो
इंद्रधमुष्याचा बांध असा नभाला घालतो
रंगीबेरंगी फुलांची नक्षी रानात गोंदतो
असा रंगारी श्रावण रंग उधळीत येतो
हिर्व्या सृष्टीच्या मळ्यात खोपा करून राहतो.

कृती ३– (आकलन कृती)

१) चौकटी पूर्ण करा– १

कवीनें श्रावण महिण्यांला दिलेली नावे
↓ [ ] ↓ [ ] ↓ [ ]

२) श्रावणातील मुलामुलींचे खेळ १
↓ [ ] ↓ [ ]

## व्याकरण

प्र. ४– कंसातील सुचनांप्रमाणे कृती करा.

१) तुमचे लिखन सरस होईल (भूतकाळ करा) १

२) जेवन झाल्यावर आम्ही गप्पा केल्या (भविष्यकाळ करा)



https://www.maharashtrastudy.com

२) पुढील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

१) चिमणी २) कुत्रा १

३) पुढील शब्दाचे वचन बदलून लिहा.

१) झूला २) घोडे १

४) समानार्थी शब्द लिहा.

१) देश = ---२) भूमी = --- १

५) कंसात दिलेले प्रत्यय जोडून पूढील शब्दाचे पूर्ण रुप लिहा. १

१) मूल (ला). २) घोडा (स)

६) पुढील शब्दांतील अक्षरांपासून चार अर्थपूर्ण शब्द लिहा. २

मानवता - [ ] [ ] [ ] [ ]

७) अचूक शब्द लिहा १

१) प्राथना/ प्रर्थाना/ प्रार्थना २) स्वतंत्र/ स्वातंत्र्य/ स्वातरंत्र्य

८) विरुद्धार्थी शब्द लिहा. १

१) सुरुवात २) पूर्ण

## विभाग ५ उपयोजित-लेखन

प्र. ५- १) पुढील उतारा वाचा आणि त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ४

विद्यार्थीजीवनात चांगल्या सवयींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चांगले साहित्य वाचणारा, योग्य त्याच बाबी लक्षात ठेवणारा, योग्य ठिकाणी खर्च करणारा, आवश्यक असेल तेवढेच बोलणारा, नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणारा विद्यार्थी भावी आयुष्यात समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करतो. त्याने निवडलेल्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्याला विशेष मेहनतीची आवश्यकता पडत नाही.

तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेणार नाहीत, तोपर्यंत तुम्हांला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही. आपल्याला काय करायचे याची दिशा दुसरा ठरवणार नाही. तुम्हांलाच दिशा ठरवायची आहे आणि तुम्हांलाच त्या दिशेने चालायचेही आहे. हे स्वप्रयत्नानेच शक्य आहे. चांगल्या सवयी केवळ स्वप्रयन्ताला चालना देत नाहीत, त्या केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

प्रश्नः-

१) चांगल्या सवयींची उदाहरणे लिहा.

२) चांगल्या सवयींची परिणाम लिहा.

३) 'स्वतःला मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वतःलाच पुढाकार घ्यावा लागेल.' या प्रकारची आणखी दोन वाक्ये उताऱ्याच्या आधारे लिहा.

४) 'संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करणे' या म्हणण्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.



https://www.maharashtrastudy.com

आ) पुढील जाहिरातीचे वाचन व निरीक्षण करुन दिलेल्या कृती सोडवा. ४

**जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक डिजिटल शाळा, पिसगाव.**

प्रवेश सुरू



इयत्ता पहिली ते आठवी

आपला प्रवेश आजच नोंदवा.

**शाळेची वैशिष्टये:**

१) डिजिटल शाळा
२) ई-लर्निंग सुविधा
३) वैयक्तिक मार्गदर्शन
४) पालकांसाठी SMS सुविधा
५) सांस्कृतिक कार्यक्रमांतून कलागुणांचा विकास
६) क्रीडा स्पर्धांचे आयेजन

**विद्यार्थी योजना:**

१) मोफत प्रवेश
२) मोफत पाठयपुस्तके
३) शासकीय गणवेश योजना
४) मुलींना उपस्थिती भत्ता
५) इतर विविध योजना

१००% गुणवत्तेची हमी

सौजन्य – शाळा व्यवस्थापन समिती, पिसगाव.

१) उत्तरे लिहा:
   १) जाहिरातीचा विषय
   २) जाहिरातदाराचे नाव.

२) तुमच्या मते, वरील जाहिरातीतील सर्वांत जास्त आकर्षित करुन घेणारा घटक कोणता ते लिहा.

३) या जाहिरातीतून देऊ केलेल्या सेचेचा अपेक्षित ग्राहक कोणते लिहा.



https://www.maharashtrastudy.com